श्री.विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मार्डी, जि.उस्मानाबाद यांच्यामार्फत केल्या जात असलेल्या बांधकाम आणि कौशल्य विकास कामासाठी रु.२.०० कोटी निधी उपलब्ध करुन देण्यास प्रशासकीय मान्यता.

महाराष्ट्र शासन
विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग
शासन निर्णय क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६३/अर्थसं
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-३२
दिनांक ७ ऑगस्ट २०१९

संदर्भ :- १) मा.मंत्री, वित्त यांनी सन २०१८-१९ चा अर्थसंकल्प सादर करताना घोषित केलेल्या योजना.
२) विजाभज इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय , यांचे पत्र क्रमांक विजाभजसं/सांगली-मार्डी/ प्रस्ताव २०१८-१९/२७१२ पुणे, दिनांक १८/०९/२०१८.
३) या विभागाचा शासन निर्णय क्र.अर्थसं-२०१८/प्र.क्र.६३/अर्थसं, दि.०७.०२.२०१९.

प्रस्तावना:-

या विभागाचा संदर्भ क्र.३ येथे नमूद, दि.०७.०२.२०१९ अन्वये निर्गमित करण्यात आलेला शासन निर्णय रद्द समजण्यात यावा.

२. मा.मंत्री (वित्त व नियोजन) यांनी सन २०१८-१९ च्या सर्वसाधारण अर्थसंकल्पात घोषणा केलेल्या मुद्यांपैकी मुद्दा क्र.४५ अन्वये "दिनदयाळ बहुउद्देशीय प्रसारक मंडळी यवतमाळ यांच्यावतीने भटक्या विमुक्त विकास प्रतिष्ठान तसेच श्री.विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मार्डी, जि.उस्मानाबाद यांच्यामार्फत केल्या जात असलेल्या बांधकाम आणि कौशल्य विकासाच्या कामासाठी प्रत्येकी रु.२.०० कोटी (रु. दोन कोटी फक्त) अनुदान देण्यासाठी नियतव्यय राखून ठेवण्यात येत आहे" असे घोषित केलेले आहे. त्यास अनुसरुन संचालक विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय यांचेकडे श्री.विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मार्डी, जि.उस्मानाबाद या संस्थेकडून बांधकाम आणि कौशल्य विकासाच्या कामासाठी प्राप्त अहवालानुसार, संचालनालनाने त्यांच्या दिनांक १८/०९/२०१८ रोजीच्या पत्रान्वये शासनाकडे प्रस्ताव सादर केलेला आहे. सदर प्रस्तावास वित्तीय मान्यतेसह प्रशासकीय मान्यता देऊन संस्थेस अनुदान उपलब्ध करुन देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. याबाबत शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय :-

श्री.विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, सांगली मार्डी, जि.उस्मानाबाद यांच्यामार्फत विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास या प्रवर्गातील प्रशिक्षणार्थी/लाभार्थीसाठी कौशल्य विकासाचे प्रशिक्षण देण्यात येणार असून, बांधकाम आणि कौशल्य विकासासाठी रु.२.०० कोटी (रुपये दोन कोटी फक्त) इतकी रक्कम एक विशेष बाब म्हणून देण्याच्या प्रस्तावास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे :-

१) संस्थेच्या या प्रकल्पाची अंदाजित किंमत रु.३०.०० कोटी इतकी असून, त्यापैकी विशेष बाब अनुदान रु.२.०० कोटी शासनामार्फत देण्यात येईल व उर्वरित रक्कम संस्था स्वत: उभी करील.

२) यासंदर्भात उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.१/१२/२०१६ च्या शासन निर्णयानुसार निविदा प्रक्रिया राबवून संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, पुणे यांच्या सल्ल्याने कंत्राटदार/ पुरवठादाराची निवड करावी.

३) कार्यारंभ आदेश प्रदान केल्यानंतर संस्थेने सहायक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद यांच्यामार्फत शासनाकडे निधीची मागणी करावी. कामाच्या प्रगतीनुसर संस्थेस निधीचे वितरण करण्यात येईल.

४) प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर ६० टक्के म्हणजेच रु.१,२०,००,०००/- (रु.एक कोटी वीस लक्ष फक्त) निधी वितरीत करण्यात येईल, तीन चतुर्थांश काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित ४० टक्के म्हणजेच रु.८०,००,०००/- (रु.ऐंशी लक्ष फक्त) निधी वितरीत करण्यात येईल. उर्वरित निधीची मागणी करण्यापूर्वी उपयोगिता प्रमाणपत्र सादर करणे संस्थेस बंधनकारक राहील.

४. बांधकामाच्या कामांचे सविस्तर अंदाजपत्रक व नकाशे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तयार करुन त्यास संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालयाची मान्यता घेण्यात यावी त्यानंतरच बांधकामांच्या कामांना कार्यारंभ आदेश सहायक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद यांचेमार्फत देण्यात यावे. तसेच कौशल्य विकासाची योजना राबवितांना कौशल्य विकास विभागाचे शासन निर्णय / परिपत्रक / धोरणानुसार यांच्या सल्ल्याने पुढील कार्यवाही करावी.

५. याद्वारे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीतून करण्यात येणाऱ्या कामांवर सहायक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद तसेच प्रादेशिक उपायुक्त, लातूर यांचेमार्फत संचालक, विजाभज, इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय यांनी देखरेख ठेवावी.

६. यासाठी संचालक, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे यांना नियंत्रक अधिकारी घोषीत करण्यात येत आहे. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद यांना आहरण व संवितरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून आहरण व संवितरण अधिकारी यांनी सदरचा निधी आहरीत करुन संस्थेस उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे, प्रत्यक्ष कामास सुरुवात झाल्यानंतर प्रथम ६० टक्के म्हणजेच रु.१,२०,००,०००/- (रु.एक कोटी वीस लक्ष फक्त) इतका निधी धनादेशाद्वारे अदा करण्याची कार्यवाही करावी व तीन चतुर्थांश काम पूर्ण झाल्यानंतर उर्वरित ४० टक्के म्हणजेच रु.८०,००,०००/- (रु.ऐंशी लक्ष फक्त) इतका निधी उपयोगिता प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर वितरीत करण्यात येईल.

७. याकरिता येणारा खर्च "मागणी क्र. झेडजी -०३, २२२५, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्ग व अल्पसंख्यांक यांचे कल्याण, ०३, मागासवर्गीयांचे कल्याण, १०२, आर्थिक विकास, (०१) विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग यांचे कल्याण, (०१) (०५) "कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी (२२२५ एफ१५६) ५०, इतर खर्च" या लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

८. सदरहू शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाच्या सहमतीने व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.४६०/व्यय१४, दि.०५/०८/२०१९ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०८०८१०४५५५८६२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Bhaurao Raghunath Gavit

Digitally signed by Bhaurao Raghunath Gavit
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=VJNT OBCS SBC Welfare Dept., postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=692454783803b1bf08be0ff2505a01eb578c61edfbb827457be5704f5b440067, serialNumber=950bc6a64b0801087d4b403d7351619557bcd3489ca14b4e0f644bf05a04e89c, cn=Bhaurao Raghunath Gavit
Date: 2019.08.08 10:53:32 +05'30'

(भा.र. गावित)

सह सचिव, महाराष्ट्रशासन

प्रत :-

१. मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई
२. मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
४. सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री, मंत्रालय, मुंबई.
५. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. विभागीय आयुक्त, औरंगाबाद
८. संचालक, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे
९. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे
१०. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) महाराष्ट्र-१/२, मुंबई/नागपूर.
११. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.

१२. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई
१३. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, लातूर,
१४. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, उस्मानाबाद,
१५. उप सचिव, वित्त विभाग, (का.अर्थ-५/व्यय-१४), मंत्रालय, मुंबई.
१६. उप सचिव, नियोजन विभाग (का.१४१३), मंत्रालय, मुंबई.
१७. भटके विमुक्त विकास प्रतिष्ठान, श्री.विश्वकर्मा औद्योगिक प्रशिक्षण केंद्र, मार्डी, जि.उस्मानाबाद
१८. सह सचिव/उप सचिव/ अवर सचिव/ कक्ष अधिकारी, विजाभज,इमाव व विमाप्र कल्याण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९. निवडनस्ती-का-अर्थसंकल्प